**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**पुणे वृत्तांत**
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 15.03.2024** **वार-शुक्रवार**

---

**विकसित भारत**

जागतिक आव्हानांच्या काळात अवलंबलेल्या लवचीक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत वृद्धी झाली असल्याचं मत, नागपूर आयआयएमचे संचालक प्राध्यापक भीमराय मेत्री यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲण्ड रीसर्चच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत 2047' या परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. पुढील तीन वर्षांत भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असेल. आणि येत्या 2030पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून सक्षमपणे उभी राहील; त्यामध्ये उत्पादन आणि कृषी क्षेत्राचा वाटा प्रत्येकी 1 ट्रिलीयन डॉलर आणि सेवा क्षेत्राचा वाटा 3 ट्रिलीयन डॉलर असेल, असं प्राध्यापक मेत्री म्हणाले.

**किडनी दिन**

पुण्याच्या ससून सर्वोपचार रूग्णालयात मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करून कालचा जागतिक मूत्रपिंड दिन साजरा करण्यात आला. दोन्ही मूत्रपिंड निकामी झालेल्या आपल्या मुलीला एका आईने आपलं एक मूत्रपिंड दान करून तिचा जीव वाचवला. अधिष्ठाता डॉक्टर विनायक काळे आणि वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर अजय तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.

**मृत मासे**

देहू नगरीच्या घाटावर शेकडो मासे मृतावस्थेत आढळल्यानंतर संतप्त स्थानिक नागरिकांनी इंद्रायणीतील वाढतं प्रदूषण रोखण्यासाठी तातडीनं उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळानंही  देहू नगरपरिषदेला त्यासंदर्भात पत्र पाठवून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प त्वरित कार्यान्वित करण्याची सूचना केली आहे.  इंद्रायणी तीरावर देहूच्या घाटावर शेकडो मासे मृतावस्थेत आढळल्यानंतर तिथल्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले होते; त्यातील प्राणवायूचे प्रमाण अपेक्षेपेक्षा खूपच कमी असल्याचं आढळून आलं, त्यामुळंच माशांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र केवळ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरु करुन इंद्रायणीतील प्रदूषण रोखलं जाणार नाही तर प्रदूषण करणाऱ्या प्रकल्पांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

**महावितरण**

थकीत वीजबिलांचा भरणा न केल्यामुळे महावितरणनं संबंधित ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम हाती घेतली आहे. गेल्या महिनाभरात पश्चिम महाराष्ट्रात 44 हजार 972 थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यात पुणे जिल्ह्यातील 29 हजार 440 थकबाकीदारांचा समावेश आहे, अशी माहिती पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी दिली.

**pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागानं 1 हजार कोटींच्या कर वसुलीचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. आता नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरता यावा, यासाठी  31 मार्चपर्यंत सुटीच्या दिवशी कर संकलन कार्यालयं सुरू ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे या कालावधीत शनिवार आणि रविवार तसंच शासकीय सुटीच्या दिवशीही कर संकलन कार्यालयं सुरू राहणार आहेत.

**खोखो**

भारतीय खो खो महासंघाने दिल्लीत येत्या 28 मार्च ते 1 एप्रिल या कालावधीत 56 व्या पुरुष महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेचं आयोजन केलं आहे. यासाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला आहे. यमध्ये पुण्याच्या प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, राहुल मंडल, वृषभ वाघ, आदित्य गणपुले तर महिला गटात प्रियांका इंगळे, काजल भोर, स्नेहल जाधव, कोमल दारवटकर, हृतिका राठोड या पुण्याच्या खेळाडूंना स्थान देण्यात आलं आहे.

**<u>फुटबॉल</u>**

विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी आणि पद्मभूषण डॉक्टर वसंतदादा पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. यात फुटबॉलच्या सामन्यात मुलांच्या विभागात मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि सिंहगड आर्किटेक्चर कॉलेज यांच्यातील सामना गोलशून्य बरोबरीत सुटला. अन्य एका सामन्यात आयानकुमार यादवने नोंदवलेल्या एकमात्र गोलच्या जोरावर डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चरने श्रीमती काशीबाई नवले आर्किटेक्चर कॉलेजचा 1-0 असा पराभव केला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 अंश तर किमान तापमान 14 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तातं, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**